**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## हिवाळी २०२० परीक्षेकरीता प्रश्नपेढी तयार करण्यास विद्या परिषदेची मान्यता
## विद्यापीठाचा डिजिटायझेशन प्रणालीमध्ये भर

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी २०२० परीक्षेकरीता बहुपर्यायी (एम.सी.क्यु.) पद्धतीने प्रश्नपेढी तयार करण्यास नुकत्याच संपन्न झालेल्या विद्या परिषदेमध्ये मान्यता प्रदान करण्यात आली. प्रश्नपेढी तयार करण्याचा महत्वपूर्ण निर्णय विद्यापीठाच्या विद्या परिषदेने घेतल्यामुळे प्रत्येक अभ्यासक्रमातील विषयासाठी मोठ्या प्रमाणात बहुपर्यायी (एम.सी.क्यु.) प्रश्नपेढी विद्यापीठाकडे उपलब्ध होणार आहे.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी लेखी परीक्षेकरीता प्रश्नपेढी तयार करण्याबाबत प्राचार्य डॉ.ए.बी. मराठे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.जी.आर. बमनोटे, प्राचार्य डॉ. दया पांडे, डॉ. वैशाली धनविजय व परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख या सदस्यांचा समावेश असलेली समिती गठीत केली होती. सदर समितीने अभ्यास करुन आपला अहवाल विद्या परिषदेसमोर सादर केला होता, त्याला विद्या परिषदेने मान्यता प्रदान केली आहे. लेखी परीक्षेकरीता प्रश्नपेढी एम.सी.क्यु. पेपर सेट संबंधित विषयाचे शिक्षक तयार करुन विद्यापीठाने सुरु केलेल्या पोर्टलवर अपलोड करतील, यासाठी स्वतंत्र पोर्टल विद्यापीठाकडून सुरु करण्यात येणार आहे.

प्रश्नसंच तयार करण्याबाबत व अपलोड करण्याबाबतची कार्यप्रणाली परीक्षा विभागाकडून निश्चित करण्यात आली असून त्यानुसार कार्य होणार आहे. डिजिटायझेशन कार्यप्रणालीमध्ये विद्यापीठाने टाकलेले हे महत्वपूर्ण पाऊल असून प्रश्नसंच सेट करणे, त्याचे मॉडरेशन करणे आदी व्यवस्था जलद गतीने होणार आहे. त्यामुळे परीक्षेसाठी प्रश्नसंच उपलब्ध करुन देणे सुलभ होणार असून विद्यार्थ्यांसाठी सुद्धा विद्यापीठाने केलेला बदल व सुरु केलेली प्रणाली महत्वाची ठरणार आहे. यासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख तसेच गोपनीय विभागाचे सहा. कुलसचिव व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले आहेत.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०९/१२/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी